| MHPU240002182022 | | | |
|---|---|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख | : | १०/०२/२०२२ |
| | प्रकरण नोंदणी तारीख | : | १०/०२/२०२२ |
| | प्रकरण निकाल तारीख | : | २१/०७/२०२६ |
| | निकालाचा कालावधी | : | ०४ व.०५ म.११ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग घोडेगाव, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी श्री.संतोष एल. वैद्य)

| फौ.की. अर्ज क्र. ३७/२०२२ | नि. क्र. ७२ |
|---|---|
| **शिल्पा तुळशिराम गावडे,**<br>वयः ३९ वर्ष, व्यवसायः घरकाम,<br>रा. द्वारा शंकर बाबुराव वाळुंज,<br>रा. लोणी धामणी, ता. आंबेगाव, जि. पुणे,<br>सध्या रा. पेठ ता. आंबेगाव, जि.पुणे. | **... अर्जदार** |
| **–विरुध्द–** | |
| **तुळशिराम भिकाजी गावडे,**<br>वयः ४७ वर्ष, व्यवसायः चालक,<br>रा. शोभा फंड, ए–७, चौथा मजला,<br>सदनिका नं. ४०४, विकोव्हॅली सोसायटी,<br>हायवेजवळ, कान्हे मावळ, ता. मावळ, जि.पुणे. | **... जाबदेणार** |

| | | |
|---|---|---|
| अर्ज | :– | **कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२, १७ ते २० व २२ अन्वये.** |

| | | |
|---|---|---|
| अर्जदारातर्फे वकील | :- | **ॲड. श्री. पी. बी. गोडसे** |
| जाबदेणारातर्फे वकील | :- | **एकतर्फा.** |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक २१ जुलै, २०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने जाबदेणार विरुध्द कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण अधिनियम,२००५ कलम १२ नुसार प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तिचा जाबदेणार सोबत दि.१३/०५/१९९९ रोजी आळंदी देवाची ता. खेड जि.पुणे येथे हिंदु धर्म शास्त्र पद्धतीने विवाह झाला असुन त्यांचे वैवाहीक संबंध अदयापपावेतो कायम आहे. सदर विवाहसंबंधातुन त्यांना अभिषेक हा मुलगा झालेला आहे. सदर विवाहाचा संपुर्ण खर्च अर्जदाराचे आई वडिलांनी केला असुन विवाहामध्ये जाबदेणार यास सोन्याचे दागिने व संसारोपयोगी वस्तु दिल्या आहेत. विवाहानंतर अर्जदार जाबदेणारकडे मौजे डावरवाडी, साल, घोडेगाव येथे नांदायला गेली. त्यावेळी जाबदेणारकडे त्याचे आई वडिल दोन भाउ व वहिनी असे एकत्र राहत होते. जाबदेणार हा कान्हेफाटा, वडगाव मावळ येथे कंपनीच्या गाडीवर चालक म्हणुन काम करत होता. एक वर्षानंतर जाबदेणार हा अर्जदारास कान्हेफाटा येथे राहण्यास घेवुन गेला. त्याठिकाणी त्यांचा संसार चांगला चालु होता. दि.०४/१२/२००० रोजी अर्जदारास अभिषेक हा मुलगा झाला. त्यानंतर जाबदेणारने अर्जदारास मुलासह गावी त्याच्या मोठया भावाच्या मुलासोबत राहण्यास सांगितले. अर्जदाराने आपण आपल्या वाटयास आलेल्या घरात किंवा आई वडिलांसह राहु असे सांगितले असता जाबदेणारने तिच्या सोबत भांडण करुन तिला मानसिक त्रास दिला. त्यानंतर जाबदेणार हा तिला कान्हेफाटा येथे सोबत राहण्यासाठी घेवुन गेला.

**०३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सन २०२० मध्ये जाबदेणारने

स्वतःच्या मालकीचा टेंम्पो घेवुन व्हॅरॅक कंपनीमध्ये माल वाहतुकीसाठी लावला. अर्जदार व जाबदेणार यांचा मुलगा अभिषेक याच्या वर्गातील मुलीचे वडिल रामदास सातकर यांच्याशी जाबदेणाराची ओळख झाली. त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली. ते दोघेजण वारंवार एकत्र फिरायला व जेवायला जात असत. तसेच जाबदेणार हा रामदास सातकर यास घरी देखील घेवुन येत असत. त्यामुळे अर्जदारास शारिरीक व मानसिक त्रास होत असत. त्यानंतर जाबदेणारने रामदास सातकर याच्यावरुन अर्जदारावर संशय घेण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदारासोबत भांडण केले. अर्जदाराने जाबदेणारास रामदास सातकर सोबतची मैत्री सोडुन देण्यास सांगितले. परंतु, जाबदेणार हा त्यास नकार देवुन दारु पिवुन अर्जदारास शिवीगाळ व मारहाण करत असे. दि.१४/१२/२०१५ रोजी जाबदेणार याने अर्जदाराच्या आईस फोन करुन बोलावुन घेतले. तसेच अर्जदाराची आई आल्यानंतर अर्जदारावर संशय घेवुन तिला सोबत घेवुन जा असे सांगितले. अर्जदार तिच्या आईसोबत निघाली असता जाबदेणारने तिला जाण्यास विरोध करुन मी तनावामध्ये उगाच बोललो असे म्हणुन बाहेर जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अर्जदार व तिच्या आईने जाबदेणार यांना समजावुन सांगितले. त्यानंतर दि.११/०२/२०१६ रोजी जाबदेणारने अर्जदारास तिची आई आजारी आहे असे सांगुण तिच्या माहेरी कल्याण येथे आणुन सोडले. तसेच अर्जदाराचा फोन देखील सोबत घेवुन गेला.

०४. त्यानंतर अर्जदाराने जाबदेणार यास फोन करुन बोलावले असता अर्जदाराचे आई वडिल व नातेवाईक यांनी जाबदेणारचे घरी बैठक घेण्याचे ठरवले. सदर बैठकीस देखील जाबदेणार हा आला नाही. तसेच त्याने अर्जदाराचा मोबाईल मुलाकडे दिला. त्यावेळी नातेवाईकांनी रामदास सातकर यास बोलावुन विचारणा केली असता त्याने अर्जदारासोबत कोणतेही संबंध नसल्याचे सांगुन गैरसमज दुर केला. तसेच जाबदेणार यास देखील समजावुन सांगितले. परंतु, जाबदेणार याने अर्जदारास नांदविण्यास नकार देवुन अर्जदारास तु मुलास सोडुन माहेरी गेली नाही तर आत्महत्या

करेल अशी धमकी दिली. त्यानंतरही एप्रील २०१६ मध्ये नातेवाईक रोहिदास बेलवरे यांच्या घरी बैठक घेतली. त्याठिकाणी देखील जाबदेणारने दारु पिवुन गोंधळ केला व अर्जदारास नांदवण्यास नकार दिला. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. जाबदेणारने अर्जदाराचा वरीलप्रमाणे शारिरीक व मानसिक छळ करुन तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. मुलगा अभिषेक हा जाबदेणारकडे राहत असुन जाबदेणार हा अर्जदारास मुलाला देखील भेटु देत नाही.

**०५.** अर्जदाराच्या पुढील कथनानुसार, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून ती स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. अर्जदाराला नाईलाजास्तव माहेरी राहाव लागत आहे. जाबदेणारकडे स्वतःचा टेम्पो असुन सदर टेम्पो तो बजाज कंपनीमध्ये भाडेतत्वावर चालवतो. त्यापासुन जाबदेणार यास दरमहा पन्नास हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार यास वडगाव मावळ ता. मावळ येथे वडिलोपार्जीत दहा एकर जमिन असुन दरमहा पन्नास हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. याउलट अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. जाबदेणारची अर्जदारास दरमहा ३५,०००/– रुपये पोटगी देण्याची ऐपत आहे. त्यामुळे अर्जदाराला अन्न–वस्त्र, औषधोपचार वगैरे साठी अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रुपये २५,०००/– पोटगी, अर्जदार हि जाब देणारकडे नांदत असतांना जाबदेणारने अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचार करुन शिवीगाळ व मारहाण करुन, मानसिक व शारिरीक छळ केला त्यामुळे नुकसान भरपाई पोटी जाबदेणाराने अर्जदारास रक्कम रुपये १०,००,०००/– नुकसान भरपाई व अर्जाचा खर्च रक्कम रुपये २०,०००/– मिळणेची मागणी अर्जदाराने केली आहे.

**०६.** जाब देणार यास नोटीस मिळुनही तो हजर झाला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण जाबदेणारविरुद्ध एकतर्फा चालवण्यात आले.

**०७.** अर्जदाराचे अर्जातील कथने व युक्तीवाद विचारात घेता माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | जाबदेणाराने अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने शाबीत केले काय ? | ...होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | ...अंशतः होकारार्थी. |
| ३. | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ? | ...अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत :-

**०८.** सदरचा मुद्दा सिध्द करण्याकरीता अर्जदार हिने स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी ११ वर दाखल केले आहे. अर्जदाराने तिची पुरावा बंदची पुरसीस निशाणी ६६ वर दाखल केली आहे. जाब देणार यास नोटीस मिळुनही तो हजर झाला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण जाबदेणारविरुद्ध एकतर्फा चालवण्यात आले. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा विना आव्हानीत राहिलेला आहे.

**०९.** अर्जदाराचे कथनाप्रमाणे ती जाबदेणाराची पत्नी असून त्यांचे वैवाहिक संबंध अदयाप कायम आहे. अर्जदाराचा पुरावा हा जाबदेणारातर्फे आव्हानीत झालेला नाही त्यामुळे अर्जदार हि जाबदेणाराची कायदेशीर पत्नी असल्याचे सिध्द होते. अर्जदाराचे पुराव्याप्रमाणे जाब देणाराने अर्जदाराच्या चारीञ्यावर संशय घेवुन तसेच तिला नांदवण्यास नकार देवुन व इतर कारणावरुन तिला शिवीगाळ मारहाण करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ करुन तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला अशी तिने तक्रार केली आहे. सदर अर्जदाराचा पुरावा विचारात घेता अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम २अ प्रमाणे पिडीत व्यक्ती ठरते.

**१०.** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अंतर्गत मागण्यांसाठी प्रथमतः अर्जदाराने तिच्यावर जाबदेणाराने कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचाराची परिभाषा सदर अधिनियमाच्या कलम ३ मध्ये नमुद केली आहे. कलम ३ अन्वये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे अशी एखादी कृती, वागणुक किंवा क्रिया किंवा वर्तणुक जी पिडीत व्यक्तीला हानी किंवा इजा पोहोचवेल किंवा तिच्या मानसिक किंवा शारीरिक आरोग्याला, सुरक्षेला, अवयवांना किंवा कल्याणाला धोका पोहोचवित असेल आणि त्यामध्ये शारीरिक गैरवर्तणूक, लैंगिक गैरवर्तणूक, शाब्दीक आणि भावनिक गैरवर्तणूक आणि आर्थिक गैरवर्तणूक करण्याचाही समावेश होतो. शारीरिक गैरवर्तणूक म्हणजे पिडीत व्यक्तीला शारीरिक वेदना पोहोचविण्यास कारण होईल अशी कोणतीही कृती किंवा वर्तणूक होय. शाब्दीक किंवा भावनिक गैरवर्तणूक म्हणजे अपमान करणे, कुचेष्टा करणे किंवा शिव्या देणे. आर्थिक गैरवर्तणूक म्हणजे एखाद्या पिडीत व्यक्तीला ती मिळविण्यास पात्र असलेल्या आर्थिक स्त्रोतापासून तिला वंचित ठेवणे होय. वरील परिभाषेच्या अनुषंगाने अर्जदारावर जाबदेणार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने शाबीत केले किंवा नाही यासाठी अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे विवेचन करणे आवश्यक आहे.

**११.** अर्जदाराने निशाणी क्रमांक ११ अन्वये पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन तिचा पुरावा दिलेला आहे. तिने तिच्या पुराव्यातील अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. तिच्या पुराव्यातुन ती जाबदेणाराची कायदेशीर पत्नी असुन त्यांचे वैवाहीक संबंध अदयाप कायम असल्याचे सिद्ध झाले आहे. तसेच सदर विवाहसंबंधातुन त्यांना अभिषेक हा मुलगा असुन तो जाबदेणारकडे राहत असल्याचे देखील अर्जदाराचे कथन आहे. तिने तिच्या पुराव्यात स्पष्टपणे कथन केले आहे की, लग्नाच्या एक वर्षानंतर ती जाबदेणारसोबत कान्हेफाटा, वडगाव मावळ येथे राहण्यास गेल्यानंतर तिला मुलगा झाल्यानंतर जाबदेणारने तिला मुलासह गावी त्याच्या मोठया भावाच्या मुलासोबत राहण्यास सांगितले. तिने आपण आपल्या वाटयास आलेल्या घरात किंवा आई वडिलांसह राहु असे सांगितले असता जाबदेणारने तिच्या सोबत भांडण करुन तिला

मानसिक त्रास दिला. तिचे पुढे असे कथन आहे की, जाबदेणाराची मुलगा अभिषेकच्या वर्गातील मुलीचे वडिल रामदास सातकर यांच्यासोबत मैत्रीचे संबंध झाले. रामदास सातकर यास जाबदेणार हा नेहमी घरी घेवुन येत असत. त्यानंतर रामदास सातकर याच्यावरुन जाबदेणाराने अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिला शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास दिला. पुढे तिने स्पष्टपने असे देखील कथन केले आहे की, जाबदेणाराने तिला शारिरीक व मानसिक त्रास देवुन नांदवण्यास स्पष्ट नकार दिला. तिने तिच्या पुराव्यात वरीलप्रमाणे जाबदेणाराने तिला शारीरिक व मानसिक त्रास देवून तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे. जाबदेणारातर्फे अर्जदाराचा पुरावा आव्हानीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा विना आव्हानीत राहिला आहे. अर्जदाराचा पुरावा खोडून काढणेसाठी जाब देणार यास पुरेशी संधी असतानाही प्रस्तूत प्रकरणात हजर होवून त्याने पुरावा दिलेला नाही किंवा अर्जदाराचा उलटतपासही घेतलेला नाही. त्यामुळे जाब देणाराने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केला हे सिध्द होते. अर्जदारातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरुन तिच्यावर जाबदेणाराने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> :-

**१२.** अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जामध्ये तिच्यासाठी दरमहा रक्कम रुपये २५,०००/- इतक्या पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदाराचे कथनाप्रमाणे जाबदेणारकडे स्वतःचा टेप्मो असुन सदर टेम्पो तो बजाज कंपनीमध्ये भाडेतत्वावर चालवतो. त्यापासुन जाबदेणार यास दरमहा पन्नास हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच जाबदेणार यास वडगाव मावळ ता. मावळ येथे वडिलोपार्जीत दहा एकर जमिन असुन दरमहा पन्नास हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. परंतु, जाबदेणारकडे टेम्पो असुन त्यापासुन त्याला दरमहा ५०,०००/- उत्पन्न मिळते हे सिद्ध करण्यासाठी अर्जदारातर्फे कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदारातर्फे मौजे

गावरवाडी ता. आंबेगाव येथील मिळकत गट क्र. १/७, २/२/अ, २/५, २/८, २४/२, २५/३, २९/६, ३/२, ३/९, ३०/१, ३१/२, ३२/११, ३२/१३, ३२/३, ३२/७, ३३/११, ३३/१४, ३३/१५, ३३/१८, ३३/५, ३३/९, ३५/३, ४/१२, ४/५, ४१/१०, ४१/६, ४१/७, ४३/१, ४४/१, ४५/१०, ४५/११, ४५/१६, ४५/१७, ४५/६, ४६/१, ४६/२, ४७/२, ४८/३, ५१/३, ६०/५, ८/३, ८१/८, ९४/१९, ९४/२१, ९४/२२, ९४/२३, ९५/१८ व ९५/३९ चे सातबारा उतारे व खातेउतारा निशाणी क्र. १४ ते ६४ अन्वये अभिलेखावर दाखल केले आहेत. सदर उता–यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जाबदेणाराचे नाव सदर मिळकतींना सामायीकामध्ये इतर मालकांसोबत नाव नमुद आहे. यावरुन सदर मिळकतींमध्ये जाबदेणाराचा हिस्सा असल्याचे दिसुन येते. त्यामुळे निश्चितच सदर मिळकतींमध्ये जाबदेणार यास उत्पन्न मिळते असे दिसुन येते. तसेच अर्जदार ही जाबदेणाराची पत्नी आहे ही बाब सिध्द झालेली आहे. अर्जदारास उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे पती या नात्याने अर्जदारास पोटगी देणे ही जाबदेणाराची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत अर्जदार व जाबदेणार यांचे परिस्थितीचा व राहणीमानाचा विचार करता अर्जदार हीस दरमहा रक्कम रु. ३,०००/– पोटगी मंजुर करणे संयुक्तीक व योग्य ठरेल. ज्याअन्वये जाबदेणार हा अर्जदारास सदर रक्कम देवू शकतो व त्यामुळे त्याच्यावर जास्तीचा भार पडणार नाही. तसेच अर्जदारास पोटगी अर्ज दाखल तारखेपासून मंजुर करण्यात येत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत :–**

**१३.** अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जात रक्कम रु. १०,००,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली आहे. परंतु अर्जदारांस जाबदेणार याने केलेल्या कौटुंबिक हिंसाचारामध्ये काही वैद्यकीय उपचार घ्यावे लागले किंवा नुकसान सोसावे लागले याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदारास मागणी केल्याप्रमाणे रक्कम रु. १०,००,०००/– नुकसान भरपाई देणे न्यायोचित होणार नाही. परंतु

अर्जदारावर जाबदेणाराने कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब शाबीत झालेली आहे. त्यामुळे मानसिक व कौटुंबिक हिंसाचारापोटी अर्जदारास रक्कम रु. १५,०००/– नुकसान भरपाई जाबदेणार याचेकडून मंजुर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष वरीलप्रमाणे अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १) | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २) | जाबदेणाराने अर्जदारास प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासुन दरमहा रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) इतकी पोटगी दयावी. |
| ३) | जाबदेणाराने अर्जदारास रक्कम रु. १५,०००/–(अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) नुकसान भरपाईपोटी द्यावे. |
| ४) | जाबदेणाराने प्रस्तुत अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रु. २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) अर्जदारास द्यावी. |
| ५) | उभय पक्षकारांना या निकालाची प्रत्येकी एक प्रत मोफत देण्यात यावी. |

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.**

SANTOSH LAXMAN VAIDYA

Digitally signed by SANTOSH LAXMAN VAIDYA
Date: 2026.07.21 17:06:56 +0530

**घोडेगाव.** **( एस. एल. वैद्य )**

**दिनांक : २१/०७/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव**

**ता. आंबेगाव, जि.पुणे.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment are same word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R. K. Shengule |
| Name of Court | : | Shri. Santosh L. Vaidya<br>Jt. Civil Judge Junior Division & J.M.F.C., Ghodegaon, Tal- Ambegaon, Dist- Pune. |
| Date of Order | : | 21/07/2026 |
| Date PO Signed | : | 21/07/2026 |
| Date of PDF/Upload | : | 21/07/2026 |